# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.06.2024** **वार – सोमवार**

---

**<u>मतमोजणी तयारी</u>**

पुणे जिल्ह्यातील पुणे शहर लोकसभा मतदारसंघासह चारही मतदारसंघांची मतमोजणी उद्या होत असून त्यासाठीची प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. पुणे शहर आणि बारामती लोकसभा मतदार संघाची मतमोजणी पुण्याच्या कोरेगाव पार्क इथल्या भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात होणार आहे, तर मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात आणि शिरूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या रांजणगाव इथल्या गोदामात होणार आहे.

सकाळी 8.00 वाजता सर्वप्रथम टपाली मतं मोजली जाणार असून त्यानंतर साडेआठच्या सुमारास मतदान यंत्रातील नियमित मतमोजणीला प्रारंभ होईल. पुणे शहर मतदार संघात मतमोजणीच्या सर्वात कमी म्हणजे 21 फेऱ्या होण्याची शक्यता असून बारामतीमध्ये 24, मावळमध्ये 25 तर शिरूर लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे 28 फेऱ्या होतील असा अंदाज आहे.

दुपारी 3 वाजेपर्यंत मतमोजणी पूर्ण करण्याच्या दृष्टीनं प्रशासनाकडून नियोजन करण्यात आलं असून सायंकाळपर्यंत जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघांचे निकाल जाहीर होतील, असा विश्वास प्रशासनानं व्यक्त केला आहे.

**<u>निरीक्षक</u>**

उद्या होणाऱ्या मतमोजणीच्या वेळी बारामती लोकसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक अर्थात काउंटिंग ऑब्झर्व्हर म्हणून पवनकुमार परंकुश यांची, मावळ लोकसभा मतदारसंघासाठी मोहम्मद हारूण यांची तर पुणे लोकसभा मतदारसंघासाठी अखिलेशकुमार सिन्हा यांची मतमोजणी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>स्मार्ट मीटर</u>**

पुणे महावितरणची 18 कार्यालयं आणि कर्मचारी निवासमधील 323 सदनिका अशा 341 वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात स्मार्ट मीटर बसविण्यास महावितरणनं स्वतःपासून सुरुवात केली आहे. दुसऱ्या टप्प्यात वीज ग्राहकांसाठी वीजमीटर बसविण्याचं काम हाती घेण्यात

येणार असल्याचं महावितरणनं म्हटलं आहे. महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी याबाबतची सूचना केली होती.

**<u>विक्रेत्यांवर लक्ष</u>**

पुणे जिल्ह्यातील काही विक्रेते  खते आणि बियाणांची जास्त दरानं विक्री करण्याच्या उद्देशानं जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करतात. अशा विक्रेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीनं 14 भरारी पथकं स्थापन करण्यात आली आहेत. खतांची चढया दरानं विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

**<u>पाहणी</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पावसाळापूर्व कामांचा आढावा घेण्यात येत असून आयुक्त शेखर सिंह यांनी शहरातील विविध भागातील नाल्यांची तसेच पाणी साठणाऱ्या संभाव्य ठिकाणांची पाहणी केली. त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.शहरात एकूण 144 नाले महापालिका हद्दीमध्ये आहेत. त्यांची साफसफाई करण्याचं  90 टक्के काम झालं असल्याचं क्षेत्रीय कार्यालयानं म्हटलं आहे.

**<u>पुस्तक प्रकाशन</u>**

आपले भविष्य भारतीय संविधान हे पुस्तक साध्या, सोप्या आणि प्रवाही भाषेत भारतीय संविधानाची माहिती समाजापर्यंत पोहोचवत असल्यानं त्याला मोठं महत्त्व आहे, असं ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर बाबा आढाव यांनी म्हटलं आहे. सुभाष वारे यांनी लिहिलेल्या 'आपले भविष्य भारतीय संविधान' या पुस्तकाच्या नवव्या आवृत्तीचं प्रकाशन आढाव यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मोबाईल व्हॅन</u>**

समर्थ युवा फाउंडेशनच्या वतीने दुसऱ्या मोबाईल मेडिकल व्हॅनचं लोकार्पण उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आलं. सकस अन्नधान्याचा पुरवठा, आजाराचं  वेळेवर निदान करणारी सुविधा आणि आजार झाल्यास वाजवी दरातील उत्तम उपचार या आरोग्याच्या त्रिसूत्रीवर काम करण्याची गरज असल्याचं मत चंद्रकांत पाटील यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<u>गांजाजप्त</u>**

पुणे सीमा शुल्क विभागानं 884 किलो गांजा एकाट्रक मधून जप्त केला आहे. हा गांजा ओडिशामधून आणण्यात आला असून तो सोलापूरला नेण्यात येत होता. त्याची किंमत 2 कोटी 20 लाख रुपये असून या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**<u>टेबल टेनिस</u>**

पहिली पुणे जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत शौरेन सोमण यानं  पुरुष गटातील अजिंक्यपद मिळवलं. आंतरराष्ट्रीय खेळाडू पृथा वर्टीकर हिनं महिला आणि 19 वर्षाखालील मुली या दोन्ही गटात विजेतेपद तर 19 वर्षाखालील मुलांच्या गटात नील मुळ्ये यानं विजेतेपद मिळविलं.

**<u>क्रिकेट</u>**

पुण्यात सुरू असलेल्या 'कॅप्टन शिवरामपंत दामले करंडक' 19 वर्षाखालील आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धेत श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमीने अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीचा पराभव करत अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमीने आर्यन्स् ॲकॅडमीचा 4 गडी राखून पराभव केला. श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमी आणि अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी या संघामध्ये विजेतेपदासाठी लढत होणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुण्यात आज सकाळीपासूनच आकाश अंशतः ढगाळ होतं. दुपारी शहराच्या काही भागात पावसाचा सौम्य शिडकावा झाला. कमाल तापमान 37 अंश तर किमान तापमान 25 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं असून उद्या शहरात हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**